# पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण

पोलीस मुख्यालय, आडगाव, नाशिक-पिन ४२२००३

दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१० E.Mail- pilcbnskr@gmail.com


---

## प्रेसनोट

दिनांक:- ३१/०८/२०१८

### नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस क्रिडा स्पर्धांचा समारोप समारंभ कार्यक्रम संपन्न

---

पोलीस मुख्यालय आडगाव येथील कवायत मैदानावर ०३ दिवसांपासुन सुरू असलेल्या २७ व्या जिल्हा पोलीस क्रिडा स्पर्धांचा काल दि. ३१/०८/२०१८ रोजी सायंकाळी भव्य समारोप समारंभ पार पडला. नाशिक ग्रामीण पोलीस दलातील ०८ उपविभागीय संघ व पोलीस मुख्यालयाचे संघातील खेळाडु असे सुमारे १३५ पोलीस खेळाडुंनी सदर स्पर्धेमध्ये सहभाग घेतला होता. समारोप कार्यक्रम प्रसंगी प्रमुख अतिथी **डॉ.श्री.नरेश गिते,** मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक हे उपस्थित होते. नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे** यांनी प्रमुख अतिथींचे पुष्पगुच्छ देवुन स्वागत केले. कार्यक्रमाचे सुरूवातीस महिला व पुरूषांचे १०० मीटर धावण्याची स्पर्धा पार पडली. समारोप सोहळयास उपस्थित असलेले मान्यवर व नागरीकांसाठी आयोजित केलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमा दरम्यान आदिवासी पारंपारिक लोकनृत्य मंडळ, करंजाळी यांनी आदिवासी व पावरी नृत्य सादर करून उपस्थित पोलीस अधिकारी व प्रेक्षकांचे मने जिंकली. तसेच स्वातंत्रवीर सावरकर तालीम व मल्लखांब संघ, कोठुरे ता.निफाड यांनी मल्लखांबच्या विविध कसरती व प्रात्यक्षिक करून कार्यक्रमाची शोभा व्दिगुणित केली. त्यानंतर ग्रामीण पोलीस दलाचे पोलीस खेळाडु यांनी शानदार संचलन करून उपस्थित मान्यवर, वरिष्ठ पोलीस अधिकारी यांना मानवंदना दिली.

सदर कार्यक्रमानंतर क्रिडा स्पर्धांमध्ये वैयक्तिक व सांघिक खेळांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणारे खेळाडुंचा प्रमुख अतिथींचे हस्ते बक्षिस वितरण समारंभाचा कार्यक्रम पार पडला. सदर स्पर्धांमध्ये वैयक्तिक क्रिडा प्रकारात **बेस्ट ॲथलिटचा किताब श्री. युवराज चव्हाण** यांना मिळाला, तर **महिला बेस्ट ॲथलिटचा मान महिला पोलीस खेळाडु कु.योगिता वाघ** यांनी पटकविला. सदर स्पर्धेतील पुरूषांची जनरल चॅम्पियनशिप पोलीस मुख्यालय नाशिक ग्रामीण संघाने पटकविली व महिलांची जनरल चॅम्पियनशिप मनमाड विभागास पटकविण्यात यश मिळाले. सांघिक क्रिडा प्रकारात फुटबॉल, हॅण्डबॉल, खो-खो, कब्बडी या खेळांमध्ये पोलीस मुख्यालयाचे संघातील खेळाडुंनी बाजी मारून प्रथम क्रमांकाचे बक्षिस मिळविले, तर कळवण विभागास व्दितीय क्रमांकाचे बक्षिस मिळाले.

वैयक्तिक क्रिडा प्रकारात जलतरण स्पर्धेत राष्ट्रीय पोलीस खेळाडु श्री. शिरीष चव्हाण यांना प्रथम क्रमांकाचे बक्षिस मिळाले, तर व्दितीय क्रमांकाचे बक्षिस संतोष कडाळे यांनी पटकविले. पुरूष बॉक्सिंग स्पर्धेत पोलीस खेळाडु श्री. सचिन पिंगळ यांनी प्रथम व श्री. रविंद्र टर्ले यांना व्दितीय क्रमांक पटकविला.  पुरूष कुस्ती व बॉक्सिंग या खेळांमध्ये बापु पगारे, संदिप बनकर, हरी पालवे, रोहित मोरे, जगदिश कडाळे, समधान शिंदे, योगेश हिरे, विकास गिते अशा खेळाडुंनी विविध वजनी गटात उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन मिळवुन बक्षिस मिळविण्याचा मान मिळविला.

महिलांचे वैयक्तिक क्रिडा स्पर्धेत कुस्तीमध्ये महिला पोलीस खेळाडु अश्विनी मडवी यांना प्रथम क्रमांकाचे बक्षिस मिळाले. बॉक्सिंग क्रिडा प्रकारात महिला पोलीस खेळाडु अस्मिता मडवई यांना प्रथम, तर मनिषा खांडेकर यांनी व्दितीय क्रमांकाचे बक्षिस मिळवुन यश संपादन केले. महिलांचे कब्बडी व खो-खो या क्रिडा प्रकारात मनमाड विभागाने प्रथम क्रमांकाचे बक्षिस मिळविले, तर व्दितीय क्रमांक पोलीस मुख्यालयाचे संघाने पटकविला. उत्कृष्टरित्या पार पडलेल्या जिल्हा पोलीस क्रिडा स्पर्धेमधील खेळाडुंना **ग्रामीण पोलीस क्रिडा प्रशिक्षक श्री. समाधान गवळी** यांचे मार्गदर्शन लाभले.

सदर स्पर्धेदरम्यान **आंतरराज्य पोलीस व्हॉलीबॉल स्पर्धेचेही** आयोजन करण्यात आले होते. व्हॉलीबॉल स्पर्धेकरीता **०५ उपविभागांसह गुजरात पोलीस दलातील डांग जिल्हयानेही** सहभाग नोंदविला होता. अत्यंत चुरशीच्या झालेल्या व्हॉलीबॉल स्पर्धेत नाशिक ग्रामीण पोलीस दलाचे संघाने प्रथम क्रमांक पटकाविला तर डांग जिल्हा संघास व्दितीय क्रमांकाचे बक्षिस मिळाले. बक्षिस समारंभानंतर नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो.** यांनी उपस्थित मान्यवर, पोलीस अधिकारी व कर्मचारी, तसेच नागरीकांचे आभार मानले तसेच जिल्हा पोलीस क्रिडा स्पर्धेत यश संपादन करणारे खेळाडुंना परिक्षेत्रीय व राज्यस्तरीय पोलीस क्रिडा स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या. पोलीस दलातील ताणतणाव कमी करण्यासाठी व आरोग्य चांगले राहण्यासाठी सदर क्रिडा स्पर्धा उपयुक्त ठरतात व सांघिक भावना वाढीस लागते असे मनोगत पोलीस अधीक्षकांनी व्यक्त केले.

तसेच नाशिक ग्रामीण पोलीस दलातील पोलीस खेळाडु श्री संतोष कडाळे यांनी एशियन रोईंग चॅम्पियनशिप स्पर्धेत सहभाग नोंदविला तसेच गतवर्षी त्यांना महाराष्ट्र शासनाचा श्री.शिव छत्रपती पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांना मान्यवरांचे हस्ते गौरविण्यात आले. तसेच अखिल भारतीय पोलीस क्रिडा स्पर्धांमध्ये रोईंग, नेमबाजी, अॅथेलॅटिक्स क्रिडा प्रकारांमध्ये यश संपादन करणारे पोलीस खेळाडु श्री. सावळीराम शिंदे, समाधान गवळी, प्रभाकर आंबेकर, बाळासाहेब भोर, विजय सुरूडे, अमोल देशमुख, सागर राउत या खेळाडूंनी केलेल्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल बक्षिसे प्रदान करून गौरविण्यात आले.

दरम्यान नाशिक जिल्हयातील महाविद्यालयीन तरूणांसाठी मा.पोलीस अधीक्षक सो यांचे संकल्पनेतुन जातीय सलोखा अंतर्गत **पोलीस/सैनिक भरतीपुर्व प्रशिक्षण २०१८-२०१९ शिबीराचे** आयोजन करण्यात येणार आहे. पोलीस क्रिडा स्पर्धेचे समारोप कार्यक्रमप्रसंगी उपस्थित असलेले प्रमुख अतिथींच्या हस्ते **पोलीस/सैनिक भरतीपुर्व प्रशिक्षण** शिबीरांचे अनावरण करण्यात आले. नाशिक ग्रामीण जिल्हयातील राष्ट्रीय व राज्यस्तरीय पोलीस खेळाडुंमार्फत जिल्हयातील महाविद्यालयीन तरूणांना भरतीपुर्व प्रशिक्षण देण्यात येणार आहे. जिल्हयातील पोलीस ठाण्यांअंतर्गत दिनांक ०४/०९/२०१८ रोजीपासुन भरतीपुर्व प्रशिक्षण शिबीरांना सुरूवात होणार असुन महाविद्यालयांचे प्राचार्य/मुख्याध्यापक यांचेशी संपर्क साधुन तारीख व वेळ ठरवुन कार्यक्रम पार पडणार आहे. यासाठी जास्तीत जास्त तरूणांनी सहभाग नोंदवुन शिबीराचा लाभ घ्यावा असे आवाहन नाशिक ग्रामीण पोलीस दलातर्फे करण्यात आले आहे.

सदर कार्यक्रमास नाशिक ग्रामीण पोलीस दलाचे पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो, अपर पोलीस अधीक्षक श्री. विशाल गायकवाड सो, पोलीस उपअधीक्षक मुख्यालय श्री. सुरेश जाधव, उपविभागीय पोलीस अधिकारी श्रीमती आर.रागसुधा, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. सदाशिव वाघमारे, पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा श्री. अशोक करपे, राखीव पोलीस उपनिरीक्षक श्री. साहेबराव जाधव, क्रिडा प्रशिक्षक श्री. समाधान गवळी यांचेसह जिल्हयातील उपविभाग व पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. तसेच नामांकित लोक प्रतिनिधी, प्रतिष्ठित नागरीक, वरिष्ठ प्रशासकिय अधिकारी तसेच विविध क्षेत्रातील नागरीकांची विशेष उपस्थितीत सदर कार्यक्रम पार पडला. सदर कार्यक्रमाचे श्रीमती सीमा पेटकर यांनी विशेष समालोचन करून कार्यक्रमाची शोभा वाढविली.